# कार्यावली

## सोमवार, दिनांक ९ जुलै, २०१२ रोजी मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१२ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाची कार्यावली.

**एक** : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**दोन** : प्रश्नोत्तरे.

**तीन** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**चार** : सन २०१२-२०१३ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**पाच** : सन २०१२-२०१३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.

**सहा** : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**सात** : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

**आठ** : अंदाज समितीचे अहवाल सादर करणे.

**नऊ** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**दहा** विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**अकरा** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

**बारा** विधानपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सादर करणे.

**तेरा** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**चौदा** : शासकीय विधेयक -

**पंधरा** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**सोळा** : शोक प्रस्ताव

**सतरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये

**अठरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये

**एकोणीस** : अशासकीय विधेयके - विचारार्थ -

**(१)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ८ - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०११. श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे

**(२)** सन २०११ चे वि.प.वि.क्रमांक १३ - महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, २०११ श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे

**(३)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, २०११. श्री. विजय सावंत, वि.प.स. यांचे

**(४)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ४ - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०११. श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे - चर्चा अपूर्णावस्थेत

**(५)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक १ - महाराष्ट्र राज्य सेवा हमी विधेयक, २०१२ . श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे

**(६)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१२ श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांचे

**(७)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ३ - महाराष्ट्र पोलीस विधेयक, २०१२ श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे

**(८)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ४ - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०१२ . श्री. चंद्रकात पाटील, वि.प.स. यांचे

**(९)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ५ - महाराष्ट्र प्रसवपूर्व निदानतंत्राच्या वापराचे विनियमन करण्याबाबत (सुधारणा) विधेयक, २०१२. डॉ. दिपक सावंत, वि.प.स. यांचे

**(१०)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ६ - महाराष्ट्र भिषक व शल्यचिकित्सक (दिवाणी व फौजदारी खटल्यापासून मुक्त ठेवणे) विधेयक, २०१२ डॉ. निलम गोऱ्हे, वि.प.स. यांचे

**(११)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ८ - महाराष्ट्र सक्तीचे निर्बीजीकरण विधेयक, २०१२ श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे

**वीस** : अशासकीय ठराव (म.वि.प.नियम १०२ अन्वये)

**श्री.संदिप बाजोरिया यांचा ठराव क्रमांक १,२,३,४,५**

(१) ''नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असे असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे. याला शंभर वर्ष जुनी बिट्रीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." ''

(२) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३) '' राज्यात अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्ये ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कामे विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होतील, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४) '' विदर्भातील हातमाग विणकरांच्या जटील बनत चाललेल्या विविध समस्या, परिणामी होत असलेली आर्थिक दुरावस्था व हलाखीचे जीवन, त्यात सुधारणा होण्याच्यादृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.हेमंत टकले यांचा ठराव क्रमांक ६,७,८,९,१०**

(६) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

(७) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९) '' राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच त्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या

सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.प्रकाश बिनसाळे यांचा ठराव क्रमांक ११,१२,१३,१४**

(११) '' राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद तसेच वाहतूक सिग्नल योग्य नसल्याने व राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसल्याने राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, विशेषतः मुंबईत वाहनांची संख्या बेसुमार वाढणे, ठिकठिकाणी पुलांचे व रस्त्याच्या दुरुस्तीची कामे सुरु असल्यामुळे तसेच फेरीवाल्याच्या अतिक्रमणामुळे वाहतुकीची होत असलेली कोंडी, रस्त्यावरील अपघातामुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे. ''

(१२) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३) '' राज्यात विशेषतः सिंधुदूर्ग, रत्नागिरी व रायगड या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी "शेतजमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणांची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या तिन्ही जिल्ह्यांच्या गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.जयंत पाटील यांचा ठराव क्रमांक १६,१७,१८,१९,२०**

(१६) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव

योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१७) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचा परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१८) '' "कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे विजनिर्मितीनंतर वशिष्ठी नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठी नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरूत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." ''

(१९) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२०) '' राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई- गोवा (वडखळ नाका) नाशिक शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनाचीं वर्दळ असलेल्या द्रुतगती महामार्गांवर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती अलका देसाई यांचा ठराव क्रमांक २१,२२,२३,२४,२५**

(२१) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२२) '' राज्यात विना अनुदानित अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांना फी वाढीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांच्या संचालकांनी फी मध्ये केलेली असमर्थनीय वाढ, सदर फी वाढीमुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिक्षण घेणे गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक कुवतीबाहेरचे होणे, परिणामी त्यांना अशा महत्वाच्या शिक्षणाला मुकावे लागणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयामधील फी भरण्यासाठी अशा हुशार व गुणवान विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शासनाने आर्थिक सहाय्य

कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावे व शिक्षण पूर्ण झाल्यावर सदरहू कर्ज हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२३) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२४) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२५) '' कोकणपट्टीवरील विशेषतः ठाणे जिल्हयातील वसई पाचूबंदर, नायगाव कोळीवाडा, किल्ला बंदर येथील किनारपट्टीवरील मच्छीमारांच्या जेटी नादुरुस्त अवस्थेत असणे तसेच त्यांची उंची कमी असल्यामुळे समुद्राचे पाणी मोठयाप्रमाणात शिरुन मच्छीमार बांधवांचे नुकसान होत असणे, परिणामी मच्छीमार कोळी बांधवांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, या बंदरांची देखभाल व दुरुस्ती करून त्यांचा विकास करण्याच्यादृष्टीने शासनाने नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.राजन तेली यांचा ठराव क्रमांक २७,२८,२९**

(२७) '' राज्यात विशेषतः ठाणे, रत्नागिरी, रायगड व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी "शेतजमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणांची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यांच्या गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२८) '' कोकणातील विशेषतः रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व ठाणे या चार जिल्हयांसाठी एक स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ स्थापन करुन त्यात मत्स्यव्यवसायासंबंधी विविध अभ्यासक्रम अंतर्भूत करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२९) '' कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेकंड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी प्रवाशांची विशेषतः महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेंता तेथे तातडीने शौचालये व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

**श्री.सुभाष चव्हाण यांचा ठराव क्रमांक ३०,३१,३२,३३,८०**

(३०) '' राज्यात ग्लोबल वार्मिंग रोखण्याच्या दृष्टीने वृक्ष लागवडीचा कार्यक्रम मोठया प्रमाणात राबविणे अत्यंत गरजेचे असल्याने राज्यातील स्वयंसेवी सामाजिक संस्थांना या उपक्रमासाठी उत्तेजनार्थ काही योजना राबवण्यासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३१) '' कोकणात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचन विषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन कोकणातील सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३२) '' पूर, गारपीट या सारख्या नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून देण्यात येणारी रुपये १००० ची आर्थिक मदत अतिशय अपुरी असल्यामुळे व ती देताना सुध्दा २ हेक्टर पर्यंतची कमाल मर्यादा असल्यामुळे नैसर्गिक आपत्तीत सापडणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळावा म्हणून शासनाने आर्थिक मदतीची मर्यादा दर हेक्टरी रुपये २००० पर्यंत वाढवावी तसेच ठरविण्यात आलेली २ हेक्टरची कमाल मर्यादा काढून टाकावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(३३) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८०) ''भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भारताची घटना लिहिली असून त्यांची किर्ती संपूर्ण जगात पसरलेली आहे. भारतीय जनतेचे त्यांच्यावर अतिशय प्रेम आहे. भारतीय जनतेचे लाडके नेते डॉ.बाबासाहेब आबेडकर हे दादर येथील हिंदू कॉलनीतील राजगृह येथे राहत होते. दादर याच ठिकाणी त्यांचे स्मारक असून त्यांच्या वापरातील अनेक मौल्यवान वस्तू तेथे ठेवण्यात आलेल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर, या दिवशी या महामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी याठिकाणी येत असतात. अशा या महामानवाचे नाव देशातील सर्व जनतेच्या चिरंतर स्मरणात राहण्यासाठी दादर रेल्वे स्थानकाचे "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक" असे नामकरण करण्यासाठी राज्यातील सर्व अनुयायी यांनी अनेक वर्षांपासून करण्यात आलेल्या मागणीचा विचार होऊन त्याबाबत आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.'' ''

**श्री.रामनाथ मोते यांचा ठराव क्रमांक ३९,४०,४२,४३**

(३९) '' मुंबई विद्यापीठाचा विस्तार व कार्यक्षेत्र लक्षात घेता मुंबई विद्यापीठाचे विभाजन करून कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठाची निर्मिती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद करीत आहे.''

(४०) '' शिक्षण घेत असलेल्या सर्व आदिवासी मुला मुलींना शैक्षणिक प्रवासात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस मध्ये मोफत प्रवास करण्याची सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४२) '' स्काऊट आणि गाईड या विषयाचे महत्व लक्षात घेऊन या विषयाचा माध्यमिक शिक्षण स्तरावरील अभ्यासक्रमात "वैकल्पिक" ऐवजी "अनिवार्य" विषय म्हणून समावेश करण्यात यावा, अशी

शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४३) '' राज्यातील सर्व धर्मादाय शैक्षणिक संस्थांचे प्रशासन प्रभावीपणे होण्यासाठी सदर संस्थांचा कारभार पहाण्यासाठी स्वतंत्र धर्मादाय आयुक्तालयाची निर्मीती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा ठराव क्रमांक ४४,४७**

(४४) '' राज्यात महिलांवरील अत्याचाऱ्यांचे प्रमाण ५० टक्के वर असणे, त्यातच हुंडाबळी, अल्पवयीन मुलींवरील बलात्कार व खून यांचे ह्यांचे प्रमाण मोठया प्रमाणात असणे, राज्यात न्यायालयात अंदाजे १ लाख २७ हजार महिलेच्या केसेस प्रलंबित असून त्यातील केवळ १०,००० केसेसचा निकाल लागणे व केवळ ४६८ केसेस मध्येच गुन्हेगारांना शिक्षा होणे हे प्रमाण ०.५ टक्के ही नसणे, त्यामुळे सुटलेल्या गुंडाकडून पुन्हा अत्याचाराची निर्माण झालेली भिती, ह्यावर शासनाने कडक कारवाई करण्याची आवश्यकता, महिलांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, शासनाने गुन्हेगारांना कठोर शिक्षा करण्यासाठी ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४७) '' राज्यातील कृषी पंपाचे एकूण २ लाख ८० हजार विज कनेक्शन द्यावयाचे असून त्यापैकी केवळ १ लाख ३० हजार ७३७ विज कनेक्शन दिले जाणे, त्यामुळे राज्यातील आवश्यक असलेल्या अर्ध्याहून अधिक कृषी पंपाचे वीज कनेक्शन दिले न गेल्यामुळे शेतकरी सिंचनापासून वंचित राहून शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होणे, ट्रान्सफॉर्मरवर ज्यादा कनेक्शन असल्यामुळे ट्रान्सफार्मर उडण्याचे घडत असलेले प्रकार ह्याकरिता ज्यादा ट्रान्सफार्मर देण्याची गरज, अर्थसंकल्पीय अधिवेशनात २ लाख ८० हजार कृषी पंपांना वीज देण्याचे दिलेले विचारात घेवून खरीब व रब्बी पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना वीज कनेक्शन देण्याबाबत शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.सतीश चव्हाण यांचा ठराव क्रमांक ४९,५०,५१,५२,५३**

(४९) '' राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्यायावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५०) '' राज्यात सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुन सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची पुरेशी संधी प्राप्त होत नाही. दिवसेंदिवस वाढती महागाई विचारात घेता बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होणे, आवश्यक आहे. तथापि, सेवायोजन कार्यालयाकडून १९८५ पासून नोकरीच्या मुलाखतीसाठी बोलावणे (कॉल) येत नाही म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढे सतत ३ वर्ष बेरोजगार राहणाऱ्या पदवीधर उमेदवारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमहा रुपये १५००/- बेकार भत्ता म्हणून देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५१) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५२) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारांअभावी निर्माण

झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारी समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५३) '' राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पीछेहाट लक्षात घेता क्रीडाक्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.चंद्रकांत पाटील यांचा ठराव क्रमांक ५४,५५,५६,५७,७९**

(५४) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(५५) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५६) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५७) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७९) '' महाराष्ट्र राज्यात दिवसेंदिवस भीक मागणाऱ्यांची वाढती संख्या, मूलभूत हक्कांपासून वंचित राहिल्यामुळे त्यांना भीक मागावी लागणे, याच असहाय्यतेचा गैर फायदा उठवून निर्माण झालेल्या व्यावसायिक टोळया, याबाबतीत असलेल्या क्लिष्ट व अपुऱ्या तरतूदी, यासर्व बाबी मानवतेच्या दृष्टीकोनातून विचारात घेवून त्यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने विधानमंडळाच्या सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रामदास कदम यांचा ठराव क्रमांक ५८,५९,६०,६१**

(५८) '' कोकणातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी कोयना धरणाचे पाणी व या दोन्ही जिल्हयात सर्वात जास्त पाऊस कोकणात पडतो, सदर पावसाचे पाणी अडवून ते कोकणातील वरकस जमिनीला देण्यासाठी पाणी पुरविण्याचेदृष्टीने शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्यांची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५९) '' राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व त्यायोगे तेथील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी तसेच यासर्व पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६०) '' मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६१) '' कोकणात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.दिवाकर रावते यांचा ठराव क्रमांक ६२,६३,६४**

(६२) '' मराठी भाषेसाठी राज्य शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा नुकताच घेतलेला निर्णय, सदर विभागासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करुन स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करण्याचा व त्यांच्या कक्षेत भाषा संचालनालय व इतर कार्यालये देण्याचा घेतलेला निर्णय, याचप्रमाणे राज्यातील ग्रामपंचायत स्तरापासून मंत्रालय स्तरापर्यंत आणि ग्रामपंचायत सदस्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात तसेच राज्याच्या एकंदरीत सर्वच व्यवहारामध्ये मराठीचा १०० टक्के वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे, तसेच, कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अथवा त्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची जबाबदारी देखील राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपविण्याचा निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६३) '' "मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्या जमिनीला भरमसाठ भाव आल्यामुळे जमिन मालकांनी बंद पडलेल्या (नफ्यातील गिरण्यासुध्दा) गिरण्याखालील जमिन विकून त्याठिकाणी गगनचुंबी, इमारती, मॉल खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात केली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोक-यासुध्दा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैकी विहित हिस्सा महापालिका म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महापालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि बांधलेली ६,९०० घरे गिरणी

कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्ष गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देण्याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री,गृहनिर्माण मंत्री, राज्यमंत्री यांचेकडे गिरणी कामगारांना माफक दरात घरे देण्याबाबत अनेक वेळा चर्चा झालेली आहे. तथापि अद्यापपर्यंत गिरणी कामगारांना घरे मिळालेली नाहीत. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टिने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बॉंड) कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६४) '' राज्य शासनाने अधिकारी / कमर्चारी यांच्या बदल्याबाबत अधिनियम केला आहे, बदली करण्यात आलेले काही अधिकारी/ कर्मचारी राज्य शासनाच्या आदेशाविरध्द मॅटमध्ये जातात. बदली आदेशास स्थगिती मिळवितात. सदर स्थगितीच्या कालावधीत बदली केलेले अधिकारी/ कमर्चारी वर्षानुवर्षे पूर्वीच्याच जागेवर राहतात. त्यामुळे बदल्याबाबतचा कायदा परिणामशून्य होतो. परिणामी बदल्यासंदर्भात केलेल्या अधिनियमाखालील हेतू सफल होत नाही व अशी प्रकरणे दिवसेंदिवस वाढत चालली आहेत हे विचारात घेवून शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**डॉ.निलम गोऱ्हे यांचा ठराव क्रमांक ६८**

(६८) '' "बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम, २००० अनुसार देशातील सर्व मुलांच्या संरक्षणाची जबाबदारी शासनावर आहे. परंतु सदर कायद्याची माहिती राज्यातील बहुतेक पोलिस स्टेशनमधील पोलिस अधिका-यांना नाही. प्रत्येक जिल्हयात पोलिसांची जिल्हा पातळीवर विशेष बाल पथके नियुक्त करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे राज्यात बालकांवरील अत्याचारांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाणे व देशात महाराष्ट्र राज्य तिस-या स्थानावर आहे. त्यामुळे सदर कायद्यातील तरतुदींची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात प्रभावीपणे व काटेकोरपणे करण्यात यावी आणि बालहक्क आयोगास आर्थिक सहाय्य करुन तो सक्षम करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." ''

**श्री.परशुराम उपरकर यांचा ठराव क्रमांक ७०,७१,७२,७३**

(७०) '' २५ ऑगस्ट,२००९ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे २००९-२०१० पासून सन २०११-१२ पर्यंतच्या ३ वर्षांच्या कालावधीत संबंधित मंत्रालयीन विभागाने तीन टप्प्यात निधी वितरीत करण्याबाबतची अंमलबजावणी न केल्याने कोकणातील चारही जिल्ह्यांना रु.५२३२ कोटी रुपये इतका निधी वितरीत न झाल्याने अनेक प्रकल्प मार्गी न लागणे पाटबंधारे प्रकल्पांतर्गत गाळ काढण्याकरिता मशीन खरेदी, पर्यटन अशा विविध कामांकरीता निधी उपलब्ध होऊ न शकणे, परिणामी, कोकणाचा विकास खुंटला असून,या विकास कामांना गती मिळण्याच्या दृष्टीने विशेष कृती कार्यक्रम राबवून त्यात आवश्यक निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७१) '' सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सिंधुदूर्ग व विजयदुर्ग हे दोन्ही किल्ले व त्यांच्या तटबंदीवर केंद्र शासनाच्या पुरातत्व खात्याची मालकी आहे व किल्ल्याच्या आतील जमिन खाजगी मालकीची आहे त्यामुळे या ऐतिहासीक वास्तूंचे जतन करताना तांत्रिकदृष्टया अडचणी निर्माण होतात, त्या अडचणींवर कायम स्वरुपी मार्ग काढण्याच्यादृष्टीने राजस्थान व गुजरात या राज्यांप्रमाणेच केंद्र शासनाने हे किल्ले राज्य शासनाच्या ताब्यात देऊन "अ" वर्गाचे राष्ट्रीय स्मारक घोषित करावे. तसेच या किल्ल्यांना

पाहण्यासाठी जागतिक पातळीवरील पर्यटकांची वाढ होईल अशा दृष्टीने राज्य शासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात यावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७२) '' मुंबई-गोवा महामार्ग क्र.१७ चार पदरी होण्याकरिता सातत्याने होत असलेली मागणी, दोन राज्य जोडणारा व पर्यटनदृष्टया महत्वाचा असणारा हा महामार्ग चारपदरी होण्यास विलंब होत असून या महामार्गावर गेल्या दोन वर्षात मोठया प्रमाणावर झालेल्या अपघातात हजाराहून अधिक लोकांचे झालेले मृत्यू, अनेकजण जखमी होणे व कोटयावधी रुपयांचे वाहनांचे झालेले अपरिमित नुकसान, सदर अपघाताच्या घटना टाळण्यासाठी व या महामार्गाचे पर्यटनदृष्टया महत्व लक्षांत घेऊन हा महामार्ग चौपदरी करण्याच्यादृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७३) '' सिंधुदूर्ग व कोल्हापूरला जोडणाऱ्या आंबोली घाटात असलेली अरुंद व वेडीवाकडी वळणे, रस्त्यांच्या बाजूने असलेली निकृष्ट दर्जाची संरक्षक भिंत, अनेक ठिकाणी कठडे नसणे, साईनबोर्डस् तसेच साईडपट्टयांचा अभाव असणे, संपूर्ण घाटाची झालेली दुरावस्था, परिणामतः या घाटात सातत्याने होत असलेले अपघात, यामुळे आतापर्यंत प्रचंड प्रमाणात झालेली व होत असलेली जिवीत हानी व वित्त हानी, नुकतीच दरड कोसळल्यामुळे रस्त्याचें कामी वापरात असलेल्या जे.सी.बी.ला झालेला अपघात, या सर्व बाबी विचारात घेता आंबोली घाटाचे चौपदरीकरणाचे काम सत्वर हाती घेऊन या घाटात दोन नवीन पर्यायी मार्ग सुरु करण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.धनंजय मुंडे यांचा ठराव क्रमांक ७४,७५,७६,७७,७८, ८०**

(७४) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, याबाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, सुशिक्षित बेरोजगारांनां पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७५) '' राज्यातील ऊसतोड कामगार ऊस तोडणीसाठी वर्षातील ८ महिने घराबाहेर राहत असल्यामुळे व त्यांच्या सोबत त्यांचे संपूर्ण कुटुंबही ऊस तोडणीसाठी स्थंलातरित होत असल्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, या ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा सुरू कराव्यात, महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या ऊसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी शासकीय वस्तीगृहांमधून निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी, तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या धर्तीवर ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शाळा, महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७६) '' नामांकित कंपन्यांच्या औषधाच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महागाची औषधे खरेदी करुन उपचार करणे, राज्यातील गोरगरीब सामान्य जनतेला परवडणारे नाही. त्यामुळे औषधांअभावी अनेक रुग्णांना मृत्यूला सामोरे जावे लागते, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपन्यांच्या औषधांप्रमाणेच येतो, तसेच जेनेरिक औषधांच्या किंमतीही तुलनेने अतिशय कमी असतात व त्या गोरगरीब सामान्य जनतेला खरेदी करणे शक्य आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने राजस्थान राज्याप्रमाणेच जेनेरिक औषधे खरेदी करून नागरिकांना ती उपलब्ध करून द्यावीत, तसेच राज्यातील

सर्व गावांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यास प्रोत्साहन द्यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७७) '' महाराष्ट्रातील थोर संत श्री शिरोमणी नरहरी महाराज यांचे कार्य समाजउध्दारासाठी प्रेरणादायक आहे. त्यांच्या कार्याचा प्रसार होणे हे समाजाच्या दृष्टीने भूषणावह आहे. त्यामुळे श्री. संत शिरोमणी नरहरी महाराज यांचे टपाल तिकीट काढण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(७८) '' राज्यातील स्त्री भ्रूण हत्यांचे प्रमाण वाढत असल्यामुळे भविष्यात सामाजिक दरी निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्त्री भ्रूण हत्यांचे प्रमाण रोखण्यासाठी आणि मुला-मुलींचा जन्मदर समान पातळीवर रहावा, यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करून त्याची कठोर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.अनिल भोसले यांचा ठराव क्रमांक ८२,८३,८४,८५,८६**

(८२) '' मानवतेचे महाभाष्याकार असलेल्या श्री.संत ज्ञानेश्वर महाराजांच्या "श्री ज्ञानेश्वरी" च्या सप्तशताब्दी वर्षापूर्ती निमित्त उचित स्मारक उभारुन त्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या नेवासे परिसराचा सर्वांगिण विकास करण्यासाठी शासनाने एक कालबध्द योजना आखून त्याची त्वरेने अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८३) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारी समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८४) '' पुणे, पिंपरी-चिंचवड व पुणे ग्रामीण भागाचे वेगाने होणारे शहरीकरण, त्या मानाने या भागात रस्त्यांचा विकास न झाल्याने वाहतुकीची होत असलेली प्रचंड कोंडी, सुलभ व जलद वाहतुकीसाठी तेथे सोईसुविधांचा असलेला अभाव, या परिस्थितीवर तोडगा निघावा यासाठी पुणे-पिंपरी- चिंचवड व पुणे शहराच्या आसपासच्या भागाच्या विकासासाठी मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर पुणे विकास प्राधिकरण नेमून त्याकरिता शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८५) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८६) '' राज्यातील अनेक नद्यांच्या परिसरात रासायनिक कारखाने, साखर कारखाने व इतर अनेंक प्रकराचे उद्योग उभारण्यात आले असून या कारखान्यांतील तसेच नदीकाठच्या गावातील प्रदूषित सांडपाणी नदीत सोडण्यात येत असल्यामुळे नदीकाठावरील अनेक गावांमध्ये विशेषत: कोकण व पश्चिम महाराष्ट्रात नद्यांचे पाणी पिण्यास अयोग्य झाले असून त्यामुळे रहिवाश्यांच्या आरोग्यावर आणि

मच्छिमार बांधवाच्या जिविकेच्या साधनांवर होणारा विपरित परिणाम लक्षांत घेता राज्यांतील जलप्रदूषण समस्येवर उपाय शोधून जलप्रदूषणास प्रभाविरित्या आळा घालण्यासाठी शासनाने कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.विक्रम काळे यांचा ठराव क्रमांक ८८,८९**

(८८) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा वा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८९) '' राज्यातील मराठवाडा व विदर्भ तुलनात्मक दृष्टया मागासलेले विभाग असल्याने त्यांच्या विकासाच्या दृष्टीने खामगाव-जालना-बीड-उस्मानाबाद- सोलापूर या नवीन रेल्वे मार्गाच्या कामाचा सर्व्हे करुन त्वरित मंजूर करुन घेण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.जयप्रकाश छाजेड यांचा ठराव क्रमांक ९०,९१**

(९०) '' राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस ढासळत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हा शोधून काढण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे ग्रामीण व शहरी भागातील जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता, या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाय सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९१) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती दिप्ती चवधरी यांचा ठराव क्रमांक ९२,९३,९४,९५,९६**

(९२) '' राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस ढासळत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हा शोधून काढण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे ग्रामीण व शहरी भागातील जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता, या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाय सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९३) '' राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद तसेच वाहतुक सिग्नल योग्य नसल्याने व राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसल्याने राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, रस्त्यावरील अपघातामुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत

आहे. ''

(९४) '' राज्यातील पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती आणि तत्सम इतर महानगरपालिकांच्या लोकसंख्योत झालेली भरमसाठ वाढ, नव्याने निर्माण झालेल्या मोठया वसाहती, त्यामुळे मोठया प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याची निर्माण झालेली गंभीर समस्या, लगतच्या ग्रामीण परिसरात महानगरमधील कचरा टाकतांना या कचऱ्यावर योग्य प्रक्रिया न झाल्यामुळे कचरा डेपोच्या परिसरातील नागरीकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, होणारे प्रदूषण, त्यामुळे ग्रामीण भागात कचरा टाकण्यास ग्रामस्थांचा असणारा तीव्र विरोध, परिणामी नगरवासीय आणि ग्रामवासीय यांच्यात संघर्ष होण्याची निर्माण झालेली शक्यता इ.बाबींना आळा घालण्यासाठी राज्य पातळीवर स्वतंत्र कचरा प्रक्रिया आणि कचरा व्यवस्थापन महामंडळ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९५) '' ग्रामीण महिलांकरिता स्वच्छता गृहाची सोय होण्याच्या दृष्टीने प्रत्येक गावात महिलांसाठी किमान प्रत्येक वार्डामध्ये एक स्वतंत्र सुलभ शौचालय बांधण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९६) '' जीवनावश्यक वस्तुंचे कडाडलेले भाव लक्षात घेता राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानांतून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.अरुण गुजराथी यांचा ठराव क्रमांक ९७,९९,१००,१०१**

(९७) '' महाराष्ट्रात रोजगार हमी योजना अनेक वर्षापासून सुरु असून त्यात ग्रामीण विभागातील कामे करण्यात येतात, सदर योजनेचे धोरण हे ग्रामीण भागातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन राष्ट्रीय मालमत्तेची निर्मिती करणे हे आहे, महाराष्ट्राच्या या योजनेला अनुसरुनच केंद्र शासनाने नेरगो ही योजना सुरु केली आहे, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात मजूरांची उपलब्धता कमी होत आहे. त्याचप्रमाणे मजूरीचे दरही वाढलेले आहेत. तसेच कोरडवाहू अल्पभूधारकाला शेती परवडत नाही. या सर्व बाबी लक्षात घेवून अल्पभूधारक कोरडवाहू शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामांचा समावेश रोजगार हमी योजनेमध्ये करावा अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९९) '' '' शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१००) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा वा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०१) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी

चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

**डॉ.सुधीर तांबे यांचा ठराव क्रमांक १०२,१०३,१०४,१०५,१०६**

(१०२) '' राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोग शाळा, ग्रंथालये इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०३) '' राज्यातील शेतकऱ्यांवर नेहमीच दुष्काळाची छाया पसरलेली असते. कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ ही परिस्थिती शेतकऱ्यांवर नेहमीच येत असते. यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात व यातून त्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या गोवा सरकारने शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु केल्या आहेत त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही राज्यातील दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०४) '' राज्यात पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी सुमारे १ लाख अंगणवाडया आहेत. संख्या समाधानकारक जरी असली तरी या अंगणवाडयाद्वारे दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळत नाही. वैद्यकीय शास्त्रानुसार लहान मुलांच्या मेंदूची ९० टक्के वाढ ही ६ वर्षापर्यंत होत असते. शैक्षणिक आवड निर्माण होणे, ज्ञानेद्रियांचा योग्य विकास होणे, तसेच बौध्दिक विकास या सर्व दृष्टीने हा कालावधी अत्यंत महत्वाचा आहे. यासाठी पूर्व प्राथमिक शाळेत दर्जेदार शिक्षण देण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करून विशेष कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१०५) '' राज्यात रस्ते अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. वाढती वर्दळ, वाहनांची संख्या, दळणवळणाच्या अपुऱ्या व निकृष्ट सुविधा, बेशिस्तपणा यांमुळे ही संख्या सातत्याने वाढत असणे, अपघातांचे स्वरुप अतिशय गंभीर असणे, त्यामुळे मृत्यूंचे प्रमाण अधिक असणे, वैद्यकीय उपचार योग्य व वेळेवर उपलब्ध नसणे यासाठी अपघातांचे प्रमाण कमी करणे व तातडीच्या वैद्यकीय सुविधांसाठी उपाययोजना करणे, यासाठी अभ्यास समिती गठीत करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०६) '' राज्यातील लोकसंख्येत विविध अपंगांचे प्रमाण सुमारे ३ टक्के आहे. यात बरेच मूकबधीर, अंध मतिमंद अस्थिव्यंग अशी वर्गवारी आहे. अपंगाच्या पुनर्वसनासाठी योग्य ती प्रभावी योजना नाही. अपंगाना दर्जेदार शिक्षण दिल्यास त्यांचे प्रभावी पुनर्वसन होऊ शकते. प्रचलित शिक्षण व्यवस्थेत अपंगासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम उपलब्ध नाही. त्यांच्या असलेल्या अपंगत्वाचा व त्यांच्या शक्तीस्थानांचा विचार करून त्यांच्या शिक्षणसाठी स्वतंत्र अभ्यासमंडळ निर्माण करण्याची शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.किरण पावसकर यांचा ठराव क्रमांक १०७,१०८,१०९,११०,१११**

(१०७) '' कोकणातील विशेषत: रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व ठाणे या चार जिल्हयांसाठी एक स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ स्थापन करुन त्यात मत्स्यव्यवसायासंबंधी विविध अभ्यासक्रम अंतर्भूत करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०८) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारी समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०९) '' कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेकंड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी प्रवाशांची विशेषत: महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेंता तेथे तातडीने शौचालये व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(११०) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा" अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१११) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती उषाताई दराडे यांचा ठराव क्रमांक ११२,११३,११४,११५**

(११२) '' राज्यात महिला बचत गटाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधी लक्षात घेता शासनामार्फत अशा महिला बचत गटांना शून्य टक्के व्याज दाराने कर्ज पुरवठा करण्यांत यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११३) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील ऊसतोडणी कामगारांच्या कुटुंबातील पाल्यांना शाळा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(११४) '' राज्यात अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्यें ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कामे विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होतील, या दृष्टीने कालबध्द

कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११५) '' महाराष्ट्र राज्यातील समाजसुधारक व ऐतिहासीक महापुरूष उदा.राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ.आंबेडकर, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर, महर्षी कर्वे, आनंदीबाई जोशी, छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज, जिजामाता इत्यादी महापुरूषांची चरित्रे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेत छापून माफक दरात सर्व सामान्य जनतेला उपलब्ध करून द्यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती विद्या चव्हाण यांचा ठराव क्रमांक १९७,११८,११९,१२०**

(११७) '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११८) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुण पिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११९) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२०) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

**प्रा.सुरेश नवले यांचा ठराव क्रमांक १२३,१२४,१२५**

(१२३) '' राज्यातील पोलिसांना २४ तासाहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे. तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे, अनेक पोलिसांना भाडयाच्याच घरात राहावे लागत आहे. शासनाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासाची अत्यंत दुरावस्था आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. म्हणून पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुटी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोंडगा काढण्याच्यादृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२४) '' राज्यातील बांधकामासाठी लागणाऱ्या विटा,खडी,रेती,सिमेंट व स्टील इत्यादी बांधकाम साहित्याच्या अमर्यादीत वाढलेल्या किंमती व रेतीच्या अचानक उद्भवलेल्या तुटवडयामुळे राज्यभरातील इमारती, रस्ते, शासकीय कार्यालयांची बांधकामे, इत्यादी विकास कामे ठप्प झाली आहेत. त्यामुळे राज्यातील बांधकाम व्यवसायासाठी लागणाऱ्या साहित्यांची नियंत्रित दरात मुबलक प्रमाणात उपलब्धता व्हावी यासाठी अभ्यास गट नेमून कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२५) '' "राज्यातील विना अनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदाना अभावी प्रयोग शाळा, ग्रंथालये इतर शैक्षणिक सोय सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरित परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना व त्यातील विनाअनुदानीत तुकडयांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**एकवीस** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबी.

**बावीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी अंतिम कार्यावली सोबत जोडण्यात येईल.)

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ५ जुलै, २०१२.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद.